# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२१ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये




(२) युवाराष्ट्र दर्शन
गोंदिया जिल्हा
मंगळवार, १३ जानेवारी २०२६

वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# नराधमाने केला चिमुकलीवर अत्याचार

**गोंदिया :** तालुक्यातील रावणवाडी पोलिस ठाण्यांतर्गत कामठा येथील एका साडेतीन वर्षीय चिमुकलीवर ३२ वर्षीय नराधमाने लैंगिक अत्याचार केला. ही घटना ११ जानेवारीच्या सायंकाळी ७ ते ८ वाजता सुमारासची आहे. या प्रकरणी रावणवाडी पोलिस ठाण्यात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गौतम हरीराम बहेकार (३२) रा. कामठा असे आरोपीचे नाव आहे.

तालुक्यातील कामठा येथे साडेतीन वर्षीय चिमुकली अंगणात खेळत होती. दरम्यान आरोपीने तिला फुसलावून निर्जनस्थळी नेवून तिच्याशी अश्लिल चाळे केले. ही बाब त्या चिमुकलीने आई-वडिलांना सांगितले. यामुळे पीडित मुलीच्या पालकांकडून रावणवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी गौतम बहेकार विरुद्ध कलम ६४ (२) (आय), ६५ (२) बाललैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ८, १२ भारतीय न्यायसंहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच आरोपी विरुद्ध अ‍ॅट्रासिटीचाही गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी साहिल झरकर करीत आहेत.

# नव्या योजनेने ग्रामीण भागात रोजगाराची नवी क्रांती



## १२५ दिवसाचे रोजगार व ७ दिवसात वेतन

**योजनेनुसार मजुरांना वर्षातून १२५ दिवसांचे रोजगार दिले जाणार आहे तसेच मजुरीची रक्कम सात दिवसांत थेट बँक खात्यात जमा होईल आणि विलंब झाल्यास व्याजासह देयक अदा केले जाईल. तसेच एक नवीन ग्रामीण रोजगार हमी कार्ड जारी केले जाईल, जे काम मागणे, मजुरी मिळवणे आणि आपले हक्क सांगण्यासाठी एक अधिकृत व मजबूत दस्तऐवज ठरेल. सरकारचा उद्देश प्रत्येक गाव आत्मनिर्भर करणे व देशाच्या एकूण विकासात त्यांचा सक्रिय सहभाग निश्चित करणे हा आहे.**

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** केंद्र सरकारने लागू केलेल्या 'विकसित भारत–जी राम जी' या नव्या योजनेमुळे ग्रामीण जीवनात रोजगाराची नवी क्रांती निर्माण होणार आहे. पूर्वीच्या मनरेगातील त्रुट्यांची पुर्तता करून ही नवी योजना केंद्र शासनाने लागू केली आहे. परिणामी या योजनेचा अधिक लाभ ग्रामीण भागातील नागरिकांना मिळणार आहे, अशी माहिती आमदार विनोद अग्रवाल यांनी स्थानिक विश्राम गृहात आयोजित पत्र परिषदेत दिली

विकसित भारत–जी राम जी योजना ही फक्त रोजगाराचे आश्वासन नसून टिकाऊ आजीविकेची हमी आहे. ही योजना ग्रामीण भारताला आत्मनिर्भर बनवून विकसित भारताच्या पायाभरणीला बळकटी देईल. गरिब, आदिवासी आणि मागासवर्गीयांना रोजगार मिळावा यासाठी हा कायदा आणण्यात आला आहे. विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय दृष्टिकोनानुसार ग्रामीण विकासाचे नव्या स्वरूपाचे आराखडे तयार करायचे आहेत. या कायद्यातील जुन्या तरतुदींमध्ये सुधारणा करून गावांना अधिक अधिकार व स्वायत्तता देण्यात आली आहे. हा विधेयक म्हणजे भारताच्या ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाकडे टाकलेले ठोस पाऊल आहे. भ्रष्टाचारमुक्त ग्रामपंचायत, सुशासन आणि जनभागीदारी हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेमुळे आत्मनिर्भर व सक्षम गावांची उभारणी शक्य होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी गरीब, शेतकरी आणि मजूर यांचा विकास ही सदैव प्राधान्याची बाब राहिली आहे. 'विकसित भारत–जी राम जी' योजनेचा मुख्य हेतू म्हणजे जुन्या कायद्यांतील त्रुटी दूर करणे, व्यवस्थेत पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचारावर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि राज्यांच्या सहकार्याने या योजनेचे डिजिटायझेशन करणे. तसेच विकसित ग्रामपंचायत उभारणे, गावांना त्यांच्या गरजेनुसार विकास आराखडे तयार करण्याचा अधिकार देणे आणि ग्रामसभांना सक्षम करणे हे देखील या योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती आ. अग्रवाल यांच्यासह उपस्थितांनी दिली. यावेळी जिल्हाध्यक्षा सौ. सीताताई रहांगडाले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, भाजप जिल्हा महामंत्री सुनील केलनका, नरेंद्र वाजपेयी, शहराध्यक्ष ऋषिकांत साहू, जयंत शुक्ला तसेच भाजपचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# माता जीजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात १२ जानेवारी रोजी माता जीजाऊ माँ सहाबे व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. दरम्यान जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या हस्ते महापुरुषांच्या छायाचित्राला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मपोशि पल्लवी गजभिये यांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकुन उपस्थितांना थोडक्यात माहिती दिली. यावेळी प्रभारी पोलीस उप-अधीक्षक रामदास शेवते, तसेच गोंदिया पोलीस विभागातील पोलीस अधिकारी/अंमलदार व मंत्रालयीन स्टाफ उपस्थित होते.

# स्नेहारिका ने पटकाविले तीन गोल्ड मेडल आणि एक रोख पारितोषिक



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथील एम.एससी. प्राणीशास्त्र विभागाची विद्यार्थिनी आणि वारकरी सांप्रदाय सालेकसा तालुक्याचे अध्यक्ष मालीकराम पटले यांची नातन कु.स्नेहारिका राजेश पटले ही नागपूर विद्यापीठातुन प्रथम आली . या विद्यार्थिनीला तीन गोल्ड मेडल आणि एक रोख पारितोषिक देऊन नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर आणि प्रमुख अतिथी अनंत पंढरे यांच्या उपस्थितीत ९ जानेवारी रोजी ११३ व्या दीक्षांत समारंभामध्ये गौरविण्यात आले आहे.

संपूर्ण विद्यापीठातून प्राणिशास्त्र विषयात प्रथम आल्याबद्दल डॉ. ए. गोपालक्रिष्ण गोल्ड मेडल, सर्व मुलींमधून प्रथम आल्याबद्दल स्वर्गीय प्राध्यापक श्रीमती शालिनी बाळासाहेब देशमुख गोल्ड मेडल, कीटकनाशक विषयात प्रथम आल्याबद्दल डॉ. व्ही.के. ठाकरे गोल्ड मेडल आणि प्राध्यापक श्रीमती एम.एस. शास्त्री रोख पारितोषिक, अशाप्रकारे तीन मेडल आणि एक पारितोषिकाचा समावेश आहे. स्नेहारिका ने सांगितले की ती सतत स्वतः नोट्स काढत होती आणि दररोज चार ते पाच तास अभ्यास करीत होती. स्नेहारिका ने आपल्या यशाचे श्रेय तिचे आजोबा मालिकराम पटले, आजी जयवंताबाई, आई उषाबाई, वडील राजेश पटले, संस्थेचे सचिव प्रफुल अग्रवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एन. मूर्ती, प्राध्यापक डॉ. एस. डी. पुरी, डॉ. पी.एस. ठाकूर, जी. व्ही. आडे, डॉ. ए. एस. भदौरिया, डॉ. एस. आय. खान आणि योगेश रहांगडाले यांना दिले आहे. स्नेहारीकाने पुढे सांगितले की जर विद्यार्थ्यांना योग्य वेळी मार्गदर्शन आणि योग्य गुरू मिळाले.

# कबड्डीमुळे तरुणांमध्ये शिस्त, संघभावना व जिद्द निर्माण होते : आमदार बडोले



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अर्जुनी-मोर. :** अर्जुनी-मोर. विधानसभा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मौजा कोयलारी (शेंडा) येथे आयोजित भव्य कबड्डी स्पर्धेचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उद्घाटनप्रसंगी आमदार राजकुमार बडोले उपस्थित होते. यावेळी त्यांनी सर्व खेळाडू, आयोजक, मान्यवर, ग्रामस्थ व कबड्डीप्रेमी यांचे मनापासून अभिनंदन केले.

आपल्या भाषणात आमदार बडोले म्हणाले की, कबड्डी हा आपल्या मातीशी नाते सांगणारा पारंपरिक खेळ असून तो केवळ शारीरिक बळ वाढवत नाही तर संघभावना, चपळाई, शिस्त आणि आत्मविश्वास निर्माण करतो. ग्रामीण भागातील खेळाडूंना अशा स्पर्धांमुळे आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळते. सर्व संघांनी उत्कृष्ट खेळ सादर करून गावाचे व परिसराचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.यावेळी उपस्थितांनी 'कबड्डी! कबड्डी!! कबड्डी!!!' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. खेळाडूंना आमदार बडोले यांनी हार्दिक शुभेच्छा देत स्पर्धेस यशस्वी होण्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.उद्घाटनप्रसंगी भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष ललित डोंगरवार, भाजपा महामंत्री हितेश डोंगरे, रजनीकांत वालदे , कैलाश भेंडारकर, देवानंद गहाणे, ओमराज दखने, दूधराम दखने, उदाराम कापगते, विश्वजीतजी बडोले, डॉ. ठेंबरे, कैलाश राऊत, सुनीताताई इलपाते आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने गावकरी व युवक उपस्थित होते.

# अभाविपच्या प्रांत सहमंत्रीपदी चौधरी यांची नियुक्ती



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तिरोडा :** तिरोडा येथील सुप्रसिध्द साहित्यिक अ‍ॅड. देवेंद्र चौधरी यांचे चिरंजीव सुजान चौधरी यांची गडचिरोली येथे आयोजित ५४ वे प्रांत अधिवेशनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद च्या प्रांतसहमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली.

सुजान चौधरी हे भाषा वैज्ञानिक मध्ये पदव्युत्तर आहेत. त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदच्या वर्धा नगर सहमंत्री पासून सुरुवात केली. त्यानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद मध्ये पूर्णवेळ होऊन त्यांची चंद्रपूर जिल्हा प्रचारक म्हणून त्यांना दायित्व देण्यात आले. आता नुकत्याच गडचिरोली येथे आयोजित पार पडलेल्या ५४ व्या प्रांत अधिवेशनात त्यांची अखिल भारतीय विद्यार्थी परिषद च्या 'प्रांत सहमंत्री' पदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आजपर्यंत विद्यार्थी हितासाठी अनेक आंदोलने केली. काही महिन्यापूर्वीच त्यांनी गोंडवाना विद्यापीठात विद्यार्थी हितासाठी आंदोलन केलेले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद च्या प्रांत सहमंत्री पदी नियुक्ती करण्यात आल्याने समस्त मेंदीपूर ग्रामवासी, सहकार नगरवासी आणि पोवार समाज बांधव आणि मित्रवर्ग यांनी त्यांच्या नियुक्ती बद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

# विद्यार्थ्यांच्यासुप्त गुणांना वाद देण्यासाठी स्नेहसंमेलनाची गरज : आ. आ. रहांगडाले



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तिरोडा :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा शाळेतच होत असतो, अभ्यासाने विद्यार्थी एकांगी बनतात तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ गीत गायन म्हणजेच स्नेहसंमेलन होणे गरजेचे आहे, असे मत आमदार विजय रहांगडाले यांनी व्यक्त केले. ते भिवरामजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बडेगाव येथील स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रतिज्ञा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्ही. बी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली आ. रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले तर दीप प्रजव्लन पं.स.सभापती तेजराम चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालिका विद्या चौधरी, सचिव पंकज चौधरी, सौरभ हाडके, जि.प.सदस्य तुमेश्वरी बघेले, सरपंच शामराव बिसेन, ए डी पटले, व्ही व्ही मेश्राम, उपसरपंच दिलेश्वरी गौतम, जयप्रकाश पटले ,दिपाली टेंभेकर, श्रीकांता सोनेवाने, मीनाक्षी जगणे, रामलाल रहांगडाले, चंद्रकांत टेंभरे, मीनाक्षी ठाकरे, दीपिका बोपचे, एम डी ठाकरे, बोरगावचे सरपंच ज्योती देशमुख, शिशुपाल रहांगडाले, रुपेश्री राणे, रजनी बिंझाडे, रज्जू अंबुले , जे डी बोदेले, यु एफ टेंभरे, चंद्रपाल कावळे ,रणवीर कोटांगले ,सुजाता रामटेके, महेंद्र कुमार मेश्राम ,रुमनबाई पटले, बजरंग चव्हाण, माया बोपचे, दिलीप कोळवते, प्रकाश भगत ,प्रल्हाद कटरे, देवराज रांगडाले, योगराज बघेले, यशवंत पटले ,प्रमोद बांते, विनोद राणे, महेंद्र रांगडाले ,यादवराव बीसेन, दुर्जन भगत, प्राचार्य डी आर गिरीपुंजे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आर एस मेश्राम, प्रास्ताविक प्राचार्य डी आर गिरीपुंजे, आभार प्रदर्शन विवेक बन्सोड यांनी केले. यशस्वीतेसाठी एस पी भगत, जी एन बीसेन, एबी राठोड, जे सी लांजेवार, गायत्री बिसेन, नंदा बोरकर, उत्कर्ष बोरकर , विवेक बन्सोड, नामदेव अटकुलवाड, वर्षा उपरीकर, एस के कटरे, व्ही व्ही मेश्राम, विनोद धावडे, संगीता वालदे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# आनंद मेळाव्यातून विद्यार्थी व्यावसायिकदृष्ट्या प्रगल्भ होतात : सौ. सविता पुराम



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** व्यावसायिकदृष्ट्या आनंद मेळाव्याच्या माध्यमातून बालकांना शाळेमधूनच व्यवसायाची सवय लागते, व्यवसाय ज्ञान, आर्थिक ज्ञान व लोकांशी बोलण्याची कला विद्यार्थ्यांना आनंद मेळाव्याच्या माध्यमातून अवगत होत असते व यामुळे अतिशय मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या फायदा होत असतो, आदिवासी विद्यार्थी भविष्यात व्यावसायिक होण्यासाठी अश्या मेळाव्याची अत्यंत आवश्यकता आहे असे प्रतिपादन यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना माजी सभापती सौ.सविताताई पुराम जिल्हा परिषद सदस्या यांनी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा पुराडा येथे शनिवार १० जानेवारीला आयोजित आनंद मेळाव्याचे उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले.

शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा पुराडा येथे दरवर्षी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असून शाळेचे प्राचार्य कमल कापसे यांच्या अध्यक्षतेखाली आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यामध्ये विद्यार्थ्यांनी अनेक खाद्यपदार्थांचे व वस्तूंचे स्टॉल लावले होते.

या आनंद मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण टप्पे,सदस्य शोभेलाल उईके, अधीक्षक अजय सोनूले, अधिक्षिका पौर्णिमा जोशी, उच्च माध्यमिक शिक्षक राजेश हट्टेवार, मेघा धोपते, वैयजंती नेणावत, वैशाली खोंडे, आशा धुर्वे, ओमप्रकाश मडावी माध्यमिक शिक्षक राजू भक्ता,सुजाता मेश्राम, पवन वंजारी, प.प्रा.शि. विजयकुमार टेंभरे , प्राथमिक शिक्षक मोरेश्वर धवणे,सुरेखा कोरे, अरविंद कुथीर ,नाईक, तसेच मंदाताई देशमुख,जयदेव भेंडारकर,मयुर राठोड,पुनम,व शाळेतील इतर सर्व कर्मचारी व मोठ्या प्रमाणात पालक विद्यार्थी या आनंद मेळाव्यात सहभागी होऊन अनेक व्यंजनांची खरेदी करून खाण्याच्या आनंद लुटला.

# संविधान गौरव परीक्षेत प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अर्जुनी मोरगाव :** समाजकल्याण विभाग, संविधान मैत्री संघ व शाळा-महाविद्यालय प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान गौरव प्रतियोगिता परीक्षा–२०२५ अंतर्गत प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील आठही तालुक्यांमधील एकूण १५० प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. परीक्षेला यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या केंद्रप्रमुख व पर्यवेक्षकांचे यावेळी प्रशस्तिपत्र देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण सहायक आयुक्त किशोर भोयर तर निमंत्रक व मार्गदर्शक प्रा. डॉ. दिशा गेडाम, तसेच वसंत गवळी, सी.पी. बिसेन, यशवंत रामटेके, समाजकल्याण विभागाचे राजेश मुधोळकर, स्वाती कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक भाषणात प्रा. डॉ. दिशा गेडाम यांनी भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या मूल्यांचे महत्व विशद करत संविधानिक मूल्ये समाजात रुजविण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. संविधान जागृती अभियानाच्या माध्यमातून हेच उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वसतिगृह, फुलचूर (गोंदिया) येथील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या संविधान जागर नृत्य-नाटिकेने उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणातून संविधानिक मूल्यांचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन अतुल सतदेवे व प्रा. मनोज मेश्राम यांनी केले, तर आभार प्रदर्शन वसंत गवळी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संविधान मैत्री संघाचे प्रा. मनोज मेश्राम, आदेश गणवीर, अनिल गोंडाणे, रोमेंद्र बोरकर, प्रा. यात्रिक भगत, हंसा बावनकर, वैशाली कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जाहीर सुचना

श्रीमती शांतीबाई बे.जगदीश यादव इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. १०, वार्ड का नाम शास्त्री वार्ड, मालमत्ता क्र.१०/१२५७ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.३०/०४/२००५ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) चित्ररेखा प्रकाश यादव, २) हिना प्रकाश यादव, ३) अनु प्रकाश यादव, ४) सुनिल जगदीस यादव न्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

## जाहीर सुचना

श्री. श्यामराव अन्नु राऊत इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. ०३, वार्ड का नाम बी.एम. पटेल वार्ड, मालमत्ता क्र.३/१११ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.९/१२/२०१६ तथा संतोष श्यामराव राऊत इनका निधन दि. १०/११/२०२० को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) दिलीपकुमार श्यामराव, २) खनक संतोष राऊत, ३) तनमय संतोष राऊत, ४) पुष्पकला संतोष राऊत, ५) विजय श्यामराव राऊत इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्राप्प्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

